# प्राथमिक



# शिष्यत्व

# पायाभूत शिष्यत्त्व

## प्रस्तावना

तुमच्या जीवनासाठी परमेश्वराकडे एक विशेष योजना आहे. तुम्ही परमेश्वराचा उद्देश पूर्ण करता की नाही, यावरच तुमच्या व प्रत्येक व्यक्तिच्या जीवनातील सफलता निर्भर आहे. परमेश्वराचा उद्देश जाणून तो पूर्ण करण्यासाठी, प्रत्येक दिवस येशूकरिता कसा जगता येईल हे जाणून घेणे आवश्यक आहे.

पहिल्या तीन पाठाचे तीन भाग आहेत.

१) पवित्र शास्त्राचा अभ्यास.

२) मूलभूत प्रश्न, आणि

३) पवित्र शास्त्राचे पाठांतर करणे.

पवित्र शास्त्राचा अभ्यास तुम्हाला परमेश्वराच्या वचनातील सत्य शिकवेल. मूलभूत प्रश्न तुम्हाला हे सत्य आपल्या जीवनात लागू करण्यास शिकवतील. पवित्र शास्त्राच्या पाठांतरामुळे तुम्ही हे सत्य आपल्या हृदयात ठेवू शकाल.

या अभ्यासात तुम्ही तुमच्या मागे चालणा—यांना येशूने केलेली कार्ये व ती कशाप्रकारे केल्या जातात, ती करण्यासाठी स्वत:ला कशाप्रकारे तयार करावे यासंबंधी शिकणार आहात.

प्रत्येक प्रकरण सुरू करण्यापूर्वी प्रार्थना करा. सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्याच शब्दात लिहा. तुम्ही जे शिकत आहात ते तुमच्या जीवनात लागू करण्यासाठी परमेश्वराला मदत मागा. परमेश्वराच्या वचनांचा अभ्यास केल्याने, तो तुम्हाला आशीर्वादित करेल.

# प्राथमिक शिष्यत्त्व
# प्रकरण १ ले
# आमचा उद्देश

**वचनांचा अभ्यास :** जी वचने दिली आहेत त्याच्या आधारे तुम्ही खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१) येशू ख्रिस्ताने आम्हाला कशासाठी बोलावले आहे ? मत्तय २८:१९—२०

२) शिष्य म्हणजे काय ? प्रे. कृत्ये ११:२६

३) एक व्यक्ती शिष्य कशी बनते ? रोम. १०:९—१०, लूक १४:२६—२७,३३

४) एखादी व्यक्ती शिष्य बनून कशी जगते ? लूक ९:२३, रोम १२:१—२

५) परमेश्वराबरोबर सतत संबंध राहण्यासाठी शिष्याने रोज काय केले पाहिजे ? लूक ४:४, मत्तय २६:४१

६) लोकांसाठी साक्ष राहण्याकरिता एखाद्या शिष्याने आपले जीवन कसे जगावे ? योहान १३:३५, मत्तय ५:१६

७) ज्या प्रकारे शिष्य प्रभूमध्ये वाढतात त्यांना कोणत्या तीन पाय—या पार कराव्या लागतात ? प्रत्येक पायरी पार करताना काय होते. ?

| पायरी | काय होते |
|---|---|
| क. | |
| ख. | |
| ग. | |

८) परमेश्वराच्या लेकरांच्या जीवनातून कोणत्या गोष्टी हटवणे आवश्यक आहे आणि त्या ऐवजी कोणत्या बाबींची पुनर्स्थापना केली पाहिजे ? इफिस ४:१७—५:७

| हटवणे | पुनर्स्थापना करणे |
|---|---|

९) ज्याप्रकारे आम्ही आत्मिक दृष्टीने वाढतो, परमेश्वर आम्हाला कोणत्या प्रकारची

मानसिकता देऊ इच्छितो ? फिलिप्पै. २:५—८

१०) ज्याप्रकारे शिष्यांची आत्मिक वाढ होते, त्यांनी काय शिकले पाहिजे ?
२ तीमथी. १:९, इफिस. ५:१७

<u>**आधारभूत प्रश्न :**</u> तुम्ही जो अभ्यास केला आहे त्यानुसार जीवन व्यतीत करा.

१) परमेश्वराबरोबर राहून येशू ख्रिस्तासाठी जगण्याकरिता तुम्हाला शिष्यत्त्वाचे पाचारण झाले आहे, अशी तुम्हाला जाणीव होते का ? होय..... नाही..... जर नाही, तर या क्षणी प्रार्थना करा आणि हे सत्य तुमच्या जीवनात वास्तविक स्वरूपात यावे यासाठी परमेश्वराला मागणी करा.

२) सेवा करण्याचा मुख्य उद्देश शिष्य बनवणे आहे, अशी तुम्ही जाणीव करता का ? होय..... नाही..... जर नाही, तर हे सत्य प्रत्यक्ष स्वरूपात आत्ताच यावे आणि त्याद्वारे चालण्यास प्रवृत्त करावे, अशी परमेश्वराला मागणी करा.

३) शिष्य बनण्यानेच आत्मिक उन्नती होऊन तुमच्या उद्देशांना पूर्ण करता येईल, अशी तुम्ही जाणीव करता का ? होय..... नाही..... जर नाही, तर हे सत्य वास्तविक स्वरूपात तुमच्यापुढे येण्यासाठी परमेश्वराला मागणी करा.

४) आपल्यात असलेल्या कमीपणावर (कमकुवतपणा) विजय मिळवणे व आपल्या मानवी विचारांना मोडून शिष्य बनणे, याची जाणीव करता का ? होय..... नाही..... जर नाही, तर याच क्षणी प्रार्थना करा आणि परमेश्वराला मदत मागा.

५) तुम्ही शिष्य आहात का ? होय..... नाही..... जर नाही, तर या क्षणी परमेश्वराने ही इच्छा तुमच्या मनात जागृत करावी अशी प्रार्थना करा. परमेश्वराच्या सानिध्यात राहून येशू ख्रिस्तासाठी जगा.

<u>**लक्षात ठेवा :**</u> **मत्तय २८:१८—२०** चे स्मरण करून परमेश्वराच्या वचनाला हृदयात ठेवा.

# प्राथमिक शिष्यत्त्व
# प्रकरण २ रे
# <u>शिष्य कसे बनवाल</u>

**वचनांचा अभ्यास :** जी वचने दिली आहेत त्याच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१) आम्हाला वाचवण्यासाठी परमेश्वर कोणत्या दोन गोष्टींचा उपयोग करतो ? आमचे जगणे केवळ येशूसाठी असावे म्हणून तो आम्हाला कशाप्रकारे मदत करतो ? रोम. १०:१७, योहान १६:७—११, १३

२) आम्ही जेव्हा शिष्य बनवतो आणि साक्ष देण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आम्हाला विरोध कोण करतो ? इफिस. ६:१२

३) सैतानी शक्तींवर विजय मिळवून, शिष्य बनवण्यासाठी आम्ही कशाचा उपयोग केला पाहिजे ? २ करिंथ १०:४—५ इफिस ६:१३—१८

४) शिष्य बनवण्यासाठी आम्ही वचनांचा उपयोग कशा प्रकारे केला पाहिजे आणि आम्ही जेव्हा हे करतो तेव्हा आमची इच्छा काय असली पाहिजे ?
२ तीमथी. ३:१६, ४:२

५) शिष्य बनवण्यासाठी आम्ही कशाप्रकारे प्रार्थना केली पाहिजे ?
१ तीमथी २:१—४, फिलिप्पै ४:६, याकोब ५:१६

६) शिष्यांच्या मनात ख्रिस्तीपणा विकसित होऊन त्यांच्या जीवनाचा उद्देश पूर्ण होण्यासाठी आम्ही त्यांना काय करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे ?
पेत्र १:५—११

७) जीवनात येणा—या समस्यांच्या बाबतीत तुम्ही शिष्यांना कोणते शिक्षण देऊ शकता, आणि त्यांच्याबरोबर कशा प्रकारचा व्यवहार केला पाहिजे ?
१ पेत्र १:६—७, रोम. ५:३—५

८) एखाद्या व्यक्तीला योग्यप्रकारे शिष्य बनवल्यास त्याच्यात काय करण्याची क्षमता असली पाहिजे ? फिलिप्पै २:१२—१३

**<u>आधारभूत प्रश्न :</u>** तुम्ही जो अभ्यास केला त्यानुसार जीवन व्यतीत करण्यासाठी मदत करण्याकरिता.

१) तुम्ही जेव्हा दुस—यांची सेवा करता तेव्हा तुम्ही पवित्र आत्मा व वचनांवर निर्भर राहता काय ? होय..... नाही..... जर नाही, तर तुम्ही जेव्हा सेवा करता तेव्हा पवित्र आत्मा व वचनांवर निर्भर राहण्यासाठी परमेश्वराला प्रार्थनेद्वारे मागणी करा.

२) तुम्ही सेवेत असताना सैतानाच्या शक्तीला ओळखता का ? होय..... नाही..... जर नाही, तर सैतानी शक्तीला ओळखण्याचा आत्मा मिळावा म्हणून परमेश्वराला प्रार्थना करा.

३) सैतानी विरोधकांच्या समोर खंबीरपणे उभे राहण्यासाठी तुम्ही आत्मिकदृष्ट्या शस्त्रसज्ज होऊन सामर्थ्यवान होता का ? होय..... नाही..... जर नाही, तर तुमच्यातील कमकुवतपणाला सामर्थ्यवान बनवण्यासाठी परमेश्वराचा शोध घ्या.

४) तुम्ही दुस—यांना त्यांच्यातील कमकुवतपणा ओळखण्यासाठी आणि सामर्थ्यवान बनवून सैतानावर विजय मिळवण्यास मदत करता का ? होय..... नाही..... जर नाही, तर आजपासूनच असे करण्यास सुरूवात करा.

५) जेव्हा तुम्ही दुस—यांची सेवा करता, तेव्हा तुम्ही वचनाचा उपयोग सौम्यपणे करता काय ? होय..... नाही..... जर नाही, तर आजपासूनच असे करण्यास सुरूवात करा.

६) जे लोक आपल्या जुनाट व चुकीच्या विचारांवर दृढ असतात त्यांच्यासाठी तुम्ही मध्यस्थीची प्रार्थना करता काय, जेणेकरून ते अशा विचारांवर विजय मिळवू शकतील ? होय..... नाही..... जर नाही, तर आजपासूनच असे करण्यास सुरूवात करा.

७) वचनामध्ये राहून जगण्याच्या सहनशक्तीचा विकास व्हावा व आत्मिकदृष्ट्या वाढ होण्यासाठी तुम्ही दुस—यांना मार्गदर्शन करता का ? होय..... नाही..... जर नाही, तर आजपासूनच असे करण्यास सुरूवात करा.

८) जे लोक जीवनातील समस्यांना तोंड देण्याचा प्रयत्न करतात, अशा लोकांच्या मानसिकतेचा विकास होऊन, त्यांनी देवाची स्तुती करावी यासाठी तुम्ही त्यांना मदत करता का ? होय..... नाही..... जर नाही, तर आजपासूनच असे करण्यास सुरूवात करा.

९) तुम्ही जेव्हा लोकांना शिष्य बनवता तेव्हा ते स्वत:च्या पायावर उभे राहण्यायोग्य होतात का ? होय..... नाही..... जर नाही, तर यामागील कारणांचा मागोवा घ्या आणि या समस्येत सुधारणा करा.

<u>लक्ष ठेवा :</u> **फिलिप्पै ४:६** चे स्मरण करून परमेश्वराच्या वचनाला हृदयात ठेवा.

**शिष्य बनवण्यासाठी आम्हाला**
**पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने**
**त्याच्या सानिध्यात चालायला पाहिजे.**



# प्राथमिक शिष्यत्त्व
# प्रकरण ३ रे
# व्यक्तिगत तयारी

**वचनांचा अभ्यास :** खाली दिलेल्या वचनांच्या आधारे प्रश्नांची उत्तरे द्या.

१) दुसऱ्यांची सेवा करण्याच्या आधी आम्ही स्वत: काय केले पाहिजे ? मत्तय ७:३—५

२) तुम्ही असे न केल्यास काय होईल ? १ करिंथ ९:२७

३) खाली दिलेल्या वचनांनुसार दुसऱ्यांना शिष्य बनवण्यासाठी आम्ही वचनाबरोबर काय केले पाहिजे ?

इफिस. ३:४
२ तीमथी. २:१५
स्तोत्रसंहिता ११९:११
स्तोत्रसंहिता १
रोम. — ६:१७—१८
योहान — १:१—३
हबक्कुक — २:२

४) खाली दिलेल्या वचनांनुसार आम्ही दुस्यांना शिष्य बनवण्यासाठी कोणत्या प्रकारे प्रार्थना केली पाहिजे ?
मत्तय २६:४१
१ तीमथी २:१—४
मत्तय ६:९—१३

५) पुढे दिलेल्या वचनांनुसार तुम्ही कोणत्या प्रकारचे आत्मिक शस्त्र धारण करता ?

सत्यतेचा कंबरपट्टा योहान. १७:१७, २ योहान ४

धार्मिकतेचे कवच रोम. १०:९—१०, लूक १४:२६—२७, ३३:१, योहान २:२९

शांतीच्या सुवार्तेचे पायताण रोम. १०:१४—१५

विश्वासाची ढाल—स्तोत्र. ३३:२०—२१

उद्धारतेचे शिरस्त्राण फिलिप्पै. ४:८

आत्म्याची तलवार इब्री. ४:१२, २ तीमथी. २:१५

प्रार्थना व सुटकेचे तीर इफिस ६:१८

६) पवित्र शास्त्रानुसार आम्ही शिष्य बनवण्यासाठी कोणत्या प्रकारची मानसिकता ठेवली पाहिजे ? लूक १०:४३—४५, योहान १३:१४—१७

<u>आधारभूत प्रश्न :</u> तुम्ही जो अभ्यास केला त्यानुसार जीवन व्यतीत करण्यास मदत करणे.

१) तुम्ही तुमच्या वैयक्तिक जीवनात सेवा करण्यासाठी तयारी करताना समस्यांना तोंड देता का ? होय..... नाही..... जर नाही, तर याक्षणी प्रार्थनेद्वारे परमेश्वराला मदत मागा.

२) शिष्य बनवण्यासाठी तयारी करताना तुम्ही वचनाप्रमाणे सर्व करता का ? होय..... नाही..... जर नाही, तर आजपासूनच असे करण्यास सुरूवात करा.

३) पवित्र शास्त्रात सांगितल्याप्रमाणे तुमच्याकडे प्रार्थनासूची आहे का ? आणि तुम्ही स्वत:साठी प्रार्थना करता काय ? होय..... नाही..... जर नाही, तर आजपासूनच असे करण्यास सुरुवात करा.

४) पवित्र शास्त्रानुसार तुम्ही तुमची आत्मिक शस्त्रे ठेवली आहेत का ? होय.. ... नाही..... जर नाही, तर आजपासूनच असे करण्यास सुरुवात करा.

५) तुम्ही जेव्हा दुस—यांची सेवा करता, तेव्हा तुमची मानसिकता एका सेवकाप्रमाणे असते का ? होय...... नाही...... जर नाही, तर परमेश्वराने एका सेवकाप्रमाणे हृदय द्यावे, अशी मागणी करा.

लक्ष ठेवा : **मार्क १०:४४** चे स्मरण करून परमेश्वराच्या वचनाला हृदयात ठेवा.

**जसा आम्ही परमेश्वराबरोबर वेळ घालवतो व लोकांना शिष्य बनवतो, त्याप्रमाणे परमेश्वर आम्हाला तयार करेल.**



# प्राथमिक शिष्यत्त्व
## प्रकरण ४ थे
## परिवर्तनीय कारवाई

**उद्देश :** ख्रिस्ताकरिता जगण्यासाठी एका विश्वासू व्यक्तीच्या ख्रिस्ती जीवनाला स्थापीत करणे.

**उद्देश :** नवीन विश्वासूला खालील गोष्टीत दृढ करणे.

१) प्रत्येक दिवशी पवित्र शास्त्राचा अभ्यास.
२) प्रत्येक दिवशी प्रार्थना.
३) पाण्याने बाप्तिस्मा.
४) पवित्र आत्म्याने परिपूर्ण जीवन.
५) मंडळीबरोबर सहभागिता.
६) त्याच्या जीवनात परमेश्वराच्या इच्छेचा शोध घेणे.

**प्रथम पायरी :**

१) प्रारंभी परिवर्तन कारवाईसाठी संपर्क साधावा. त्यांना आमंत्रण द्या किंवा प्रत्यक्ष भेट घ्या. (शक्य असल्यास २४ तासाच्या आत) योग्य अशी वेळ ठरवा.
उदा. ''नमस्कार ! मी............................., .............................. मंडळीतर्फे आलो आहे. मला असे वाटते की................................ ने तुमच्यासाठी येशू ख्रिस्ताचा स्वीकार करण्यासाठी प्रार्थना केली आहे. आमची अशी इच्छा आहे की, तुमच्या जीवनात ख्रिस्ती जीवनाची सुरुवात व्हावी. त्यासाठी आपण............ दिवशी भेटू शकतो.

२) पवित्र शास्त्राचा अभ्यास सुरू करा. प्रथम भेटीत 'प्राथमिक ख्रिस्ती जीवन' जो प्राथमिक धडा आहे, तो करावा.

३) त्यांना आमंत्रण द्या किंवा मंडळीत घेऊन या.

४) शक्य असल्यास ते विश्वासात दृढ होईपर्यंत आठवड्यातून दोन वेळा भेटण्याचा प्रयत्न करा.

५) प्रत्येक दिवशी प्रार्थना, पाण्याचा बाप्तिस्मा आणि पवित्र आत्म्याने परिपूर्ण असे जीवन व्यतीत करण्यासाठी, त्यांच्या जीवनातील परमेश्वराच्या इच्छेचा शोध घेण्याकरिता त्यांना प्रोत्साहित करा.

६) स्वत:ला सल्ला देण्यायोग्य बनवा किंवा विशेष गरज असताना साहाय्य करा.

<u>**आधारभूत प्रश्न :**</u> जे तुम्ही शिकले आहात त्यात मदत करण्यासाठी –

या पाठात दिलेल्या परिवर्तनीय कारवाईच्या निर्देशतत्त्वांचा तुम्ही उपयोग करत आहात का ? होय..... नाही...... जर नाही, तर आजपासूनच असे करण्यास सुरू करा.

स्वाभाविक स्वरूपात लागू करणे : जी निर्देशतत्त्वे दिली आहेत, त्यानुसार तुम्ही ज्या लोकांना प्रभूच्या विश्वासात आणले, त्यांना शिष्य बनवण्यासाठी सुरुवात करा.

# प्राथमिक शिष्यत्त्व
# प्रकरण ५ वे
# लक्षात ठेवण्यासाठी विशेष गोष्टी

**उद्देश :** मत्तय २८:१८—२० असे सांगितले आहे की, आमचे काम शिष्य बनवणे आहे. (जे संपूर्ण हृदयाने येशू ख्रिस्तासाठी जगतात.) दुस—यांना शिष्य बनवण्याच्या आधी तुम्हाला एक शिष्य बनणे आवश्यक आहे. सेवा करणे व मंडळीची स्थापना करण्यासाठी सुवार्ता प्रचार व शिष्यत्त्व आवश्यक आहे. या पाठात तुम्हाला हे दाखवले आहे की, शिष्यत्त्व म्हणजे काय व एखाद्याला शिष्य कसे बनवावे.

**नवीन व्यक्तीला शिक्षण देणे :** एखाद्या नवीन व्यक्तीला शिष्य बनवताना चार मूलभूत गोष्टींकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे. या चार मूलभूत गोष्टींकडे नव्या कराराच्या लेखकांनी देखील लक्ष केंद्रित केले होते.

क. व्यक्तिगत जीवन.
ख. पारिवारिक जीवन.
ग. मंडळीचे जीवन.
घ. सुवार्तेचे जीवन.

एखाद्या नवीन व्यक्तीला शिक्षण देण्यासाठी वचनांचा अभ्यास करण्यासाठी सांगा. त्याने केलेल्या अभ्यासाचे त्याच्या जीवनात लागूकरण करण्यासाठी त्याला काही मूलभूत प्रश्न विचारा, यामुळे त्याला मदत होईल.

**शिष्य :** लक्षात ठेवा शिष्य एक अशी व्यक्ती आहे की, जिचा परमेश्वराबरोबर रोज संबंध येतो. यामुळे ती व्यक्ती येशू ख्रिस्तासाठी जगते.
परमेश्वराबरोबर रोजच्या संबंधात खालील गोष्टींची आवश्यकता आहे.

**क. वचन (जीवनाची भाकर)**

१) ते वाचा — इफिस. ३:४
२) त्याचा अभ्यास करा. २ तीमथी २:१५
३) त्यावर मनन करा. स्तोत्र. १
४) आठवण करा. स्तोत्र ११९:११
५) त्याला लिहीत रहा हबक्कूक २:२
६) त्याप्रमाणे जगा रोम. ६:१७—१८
७) त्याला वाटत रहा (सांगणे) १ योहान १:१—३

**ख. प्रार्थना —**

१. तुमच्यासाठी — मत्तय २६:६१

२. दुस—यांसाठी — १ तीमथी २:१

येशू ख्रिस्तासाठी जगण्याकरिता खालील बाबी आवश्यक आहेत —

क. सहभागिता — योहान १३:३५

ख. साक्ष देणे — मत्तय ५:१६

आम्ही जर शिष्य आहोत तर आम्ही आत्मिक स्वरूपात देखील वाढतो.

आत्मिक वाढीच्या तीन पाय—या आहेत. १ योहान २:१२—१४

क. बालक

ख. तरूण

ग. प्रौढ (वृद्ध)

**आत्मिक वाढीत खालील गोष्टींचा अंतर्भाव आहे —**

क. आमच्यात असणा—या जुनाट व पारंपरिक परंतु निष्फळ विचारांना तोडून आपल्या दुर्बलतेवर विजय मिळवणे. इफिस ४:१७ — ५:१६

ख. ख्रिस्ती हृदयाची स्थापना करणे. २ पेत्र १:५—१०

ग. आमच्या जीवनातील परमेश्वराचा उद्देश ओळखून तो पूर्ण करणे. २ तीमथी १:९ आणि इफिस. ५:१७

शिष्यत्त्व म्हणजे एखाद्या व्यक्तीला त्याच्या व्यक्तिगत दुर्बलतेवर आणि पारंपरिक निष्फळ विचारांना तोडण्यासाठी मदत करणे. एखाद्या व्यक्तिला पवित्र शास्त्रातील मूळ सिद्धान्त शिकण्यास मदत करणे. वचन व प्रार्थनेच्या सेवेद्वारे पारिवारिक जीवन, मंडळीतील जीवन, सुवार्ता प्रसार आणि सेवेच्या कार्याचे शिक्षण देणे.

येशू ख्रिस्ताची सेवा करणे म्हणजेच सेवेचे कार्य करणे होय. यात खालील बाबींचा अंतर्भाव आहे.

क. प्रार्थनेची सेवा

ख. वचनाची सेवा

ग. गरजवंतांची सेवा

परमेश्वराची अशी इच्छा आहे की, प्रत्येक समस्येवर त्याच्या लोकांनी विजय मिळवावा. परमेश्वराचा प्रत्येक व्यक्ती त्याच्या कार्यात उपयोगी ठरावा व त्याला अनंतकाळपर्यंत आशीर्वाद मिळावा.

**गुरू (भाऊ किंवा बहीण जो आत्मिक दृष्टीने मोठा असेल) :**
एक अशी व्यक्ती, जी आपल्या दुर्बलतेवर वचन व प्रार्थनेद्वारा विजय मिळवून येशू ख्रिस्तासाठी जगत आहे.

**शिष्य बनवण्यासाठी व्यावहारिक पाऊल :**

क. नवीन विश्वासूची माहिती घ्या. (नाव, पत्ता, वगैरे)

ख. पवित्र शास्त्रातील नवा करार देऊन त्याचा उपयोग समजावून सांगा.

ग. शक्य तितक्या लवकर पत्राद्वारे किंवा दूरध्वनीद्वारे त्याच्याबरोबर व्यक्तिगत संपर्क साधावा. (२४ तासाच्या आत.)

घ. व्यक्तिगत जीवन, पारिवारिक जीवन, मंडळीगत जीवन आणि शक्य तितक्या लवकर सुवार्तेच्या मूळ प्रकरणाचे वाचन करा.

**मूळ प्रश्न :** विद्यार्थी जे शिकला त्याप्रमाणे त्याला जीवन व्यतीत करण्यात मदत करा.

१. तुम्ही शिष्य आहात का ? होय..... नाही..... जर नाही, तर आजपासूनच तुम्ही असे बनण्याचा निर्णय घ्या.

२. दुस—यांना शिष्य बनविण्यासाठी तुम्ही अभ्यासूपणे प्रभूच्या सानिध्यात वाढत आहात का ? होय..... नाही..... जर नाही, तर आजपासूनच असे करण्यास सुरूवात करा.

३. अभ्यासातील निर्देशित तत्त्वानुसार तुम्हाला शक्य असेल तितके तुम्ही शिष्य बनवण्याचा प्रयत्न करता का ? होय...... नाही..... जर नाही, तर आजपासूनच असे करण्यास सुरूवात करा.

**व्यावहारिक स्वरूपात लागू करा :** विद्यार्थ्यांनी ज्यांना प्रभूमध्ये आणले आहे, त्यांना दिलेल्या निर्देशानुसार परमेश्वराच्या सानिध्यात वाढण्यास मदत करा.

लोकांच्या जीवनासाठी परमेश्वराकडे एक विशेष उद्देश आहे, अशा लोकांना शोधून परमेश्वराचा उद्देश पूर्ण करण्यासाठी मदत करा. तुम्हाला किंवा अन्य कोणालाही यापुढील प्रशिक्षण, प्रार्थना किंवा येशू ख्रिस्ताविषयी माहिती हवी असल्यास, तसेच याविषयी अन्य माहिती पाहिजे असल्यास कृपया आमच्याबरोबर संपर्क स्थापीत करा.

# BASIC INSTITUTE REQUEST FORM

तुम्हाला यापुढील शिक्षण इंग्रजी भाषेत पाहिजे असल्यास
आमच्याबरोबर संपर्क स्थापीत करा.

**NAME ____________________________________**

**ADDRESS ________________________________________**

**CITY ____________ STATE ____________ ZIP _________**

**COUNTRY ____________________**

**HOME PHONE ______________ I would like to train in English.**

**WORK PHONE________________ Please send me the BASIC Institute Catalog.**

**CELL PHONE__________________**

**BEEPER ________________**

**FAX ____________________**

**EMAIL _____________________**

**I have a prayer request.**
**(Please put on back)**

**Mail To :**
**BASIC Institute**
**P.O. Box 431**
**Kiln, MS 39556 U.S.A.**
**Or Phone (228) 255-9251 / Fax (228) 255-8927**
**Email basic@basicministries.com**
**Web page www.basicministries.com**

या अभ्यासाद्वारे तुम्ही आशीर्वादीत झाले असाल, तर या अभ्यासपुस्तिकेच्या प्रतिलिपी अन्य लोकांना द्या.

प्रकाशकाद्वारे थेट प्राप्त करू शकता. तुम्हाला कोणत्या भाषेत पाहिजे ते आम्हाला इंग्रजीत कळवा.

**WRITE TO :**


**BROTHERS & SISTERS IN CHRIST**
**P.O. BOX 431**
**KILN, MS 39556**
**U.S.A.**

**Phone (228) 255-9251**

**Fax (228) 255-8927**


**Copies are available by Email**
**Send your request to** basic@basicministries.com
**Or**
**Visit our web site**
www.basicministries.com

**COPIES ARE AVAILABLE IN OTHER LANGUAGES.**
**CONTACT US FOR MORE INFORMATION.**

या संपूर्ण जगाला एक सुंदर व योग्य अशी जागा कशी बनवावी, हे जाणून घेण्याची तुमची इच्छा आहे का ?

परमेश्वराने मानवजातीला कोणती शेवटची महान आज्ञा दिली होती आणि ती कोणत्या प्रकारे पूर्ण करता येईल, हे जाणून घेण्याची तुमची इच्छा आहे का ?

तुम्ही अन्य लोकांना त्यांच्या समस्यांवर विजय प्राप्त करण्यासाठी मदत करण्याची इच्छा बाळगता का ?

येशूच्या सानिध्यात एक स्थिर व विजयी जीवन जगण्यास अन्य लोकांना कशाप्रकारे मदत करावी, हे जाणून घेण्याची तुमची इच्छा आहे का ?

येशूमध्ये कशाप्रकारे जीवन जगावे, याबाबतची माहिती तुम्ही तुमच्या इष्टमित्र व त्यांच्या परिवारात देऊ इच्छिता का ?

तर हे पुस्तक तुमच्यासाठीच आहे

बंधू हेनरी पल्सीफर द्वारा संकलित
आणि
पॉला मिंगुची द्वारा रेखाटलेली चित्रे

तुम्हाला सफल व विजयी जीवन जगण्यासाठी साह्य होण्याकरिता अभ्यास साखळीची ही प्रथम रचना आहे. बंधू हेनरी पन्नासपेक्षा अधिक वर्षांपर्यंत येशूकरिता जगले, त्यामुळे त्यांनी विजयाचा अनुभव घेतला. येशूचा क्रुस घेऊन चालल्यामुळे त्यांना कॅन्सरपासून मुक्ती मिळाली. आरोग्य प्राप्त झाल्यावर त्यांनी संपूर्ण जगाची यात्रा केली. या यात्रेदरम्यान, येशूसाठी जगल्याने विजय आणि सफलता कशाप्रकारे प्राप्त होते, हे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे परमेश्वराचा उद्देश त्यांच्या जीवनात कसा पूर्ण होईल हे शिकवले.

पवित्र शास्त्रातील मूळ सिद्धान्त समजून त्याप्रमाणे जीवन जगण्यास लोकांना साहाय्य व्हावे, यासाठी त्यांनी आपल्या अनुभवांवर आधारित लेखांचे संकलन केले आहे. यामुळे लोकांना सफल जीवन प्राप्त होऊ शकेल. पारिवारीक जीवनासाठी परमेश्वराचे सिद्धान्त समजण्यास साहाय्यक व्हावे, यासाठी या विशेष अभ्यासाची रचना केली आहे. या अभ्यासाद्वारे तुमच्या व्यक्तिगत जीवनात धार्मिकता येऊ शकते व प्रत्येक दिवस येशूसाठी जगल्याने तुम्हाला जीवनात

सफलता प्राप्त होईल. या अभ्यासाचा उपयोग करून तुम्ही अन्य लोकांना पारिवारीक जीवन संबंधी शिकवू शकता.

**प्रतिलिपीचे सर्वाधिकार १९९० सर्व हक्क सुरक्षित**

या अभ्यासाचा कोणताही भाग प्रकाशकाच्या परवानगीशिवाय पुनर्मुद्रित करू नये. मर्यादित भाग छापल्यास ते मोफत वाटावे.

PUBLISHED BY :

BROTHERS & SISTERS IN CHRIST
P.O. Box 431
Kiln, MS 39556
USA

Phone (228) 255-9251
Fax (228) 255-8927
Email basic@basicministries.com
On the web at www.basicministries.com